# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: ५६, रूपये:- ९५,४७,३५,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (१) | ६२४७ | १० | मुंबईसह राज्यातील विविध ठिकाणी शासकिय निवासस्थाने असणे, या शासकिय निवासस्थानांची दुरावस्था झालेली असणे, बहुतांश निवासस्थानाची मागील बऱ्याच काळापासून दुरुस्ती झालेली नसणे, या निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, या निवासस्थानांचा लवकरात लवकर पुर्नविकास करण्याची स्थानिक नागरिकांची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पुल**<br>**बाब क्रमांक: ५७, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२) | ६२८१ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील खिरोदा फैजपूर रोझोदा चिनावल विवरा प्रजिमा ७२ हा रस्ता अनेक दिवसांपासून खराब असल्याने दळणवळणास मोठ्या प्रमाणात तेथील वाहनधारकांना कसरतं व त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६२८५ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील टाकरखेडा चिखली भालोद हिंगोणा न्हावी खिरोदा उटखेडा रावेर रस्ता प्रजिमा ५८ हा अनेक दिवसांपासून खराब असल्याने दळणवळणास मोठ्या प्रमाणात तेथील वाहनधारकांना कसरत व त्रास सहन करावा लागत आहे. परीस्थिती पाहता शासना व सरकार बद्दल जनतेत पसरलेले असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ६२८६ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील खिरोदा फैजपूर रोझोदा चिनावल विवरा उटखेडा कुसुंबा ते प्रजिमा ७२ हा अनेक दिवसांपासून खराब असल्याने दळणवळणास मोठ्या प्रमाणात तेथील वाहनधारकांना कसरत व त्रास सहन करावा लागत असुन शासना व सरकार बद्दल जनतेत पसरलेले असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६२९१ | १० | रावेर (जि. जळगाव) तालुक्यातील पाल, मोरव्हाल, जिन्सी, आभोडा, रसलपुर, रावेर विटवा निचोल रस्ता प्रजिमा-१७ कि.मी. १५/८०० मध्ये जोडरस्त्यासह पुलाचे बांधकाम करण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६२९३ | १० | ता. रावेर (जि. जळगाव ) चितोडा अट्रावल चिखली अंजाळे दुसखेडा थोरगव्हाण रस्ता प्रजिमा-१४ किमी ६/०० ते ११/०० मध्ये रस्त्याची सुधारणा करण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६२९४ | १० | रावेर ( जि. जळगाव ) पातोंडी पिंप्रींनादू कुन्हा पढोदा डोलारखेडा रस्ता रा. मा. ४७ कि.मी. ५/४०० मध्ये क्षतिग्रस्त मोरीची सुधारणा करणे, खिरोदा रोझोदा चिनावल विवरा उटखेडा कुसुंबा रोड प्रजिमा-१ व प्रजिमा -७२ कि. मी. १०/०० ते १३/०० व १५/५०० ते १९/०० या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे, प्रजिमा ५८ कुंभारखेडा चिनावल वाघोदा निभोरा प्रजिमा ७३ किमी ०/०० ते ५/०० रस्त्याची सुधारणा करणे, धरणगांव सोनवद चमगाव जामोद भोकर इदगांय शेळगांव टाकरखेडा भालोद न्हायी रोड प्रजिमा ५८ कि.मी. ६६/३०० ते ६६/९०० हिंगोणा गावामध्ये कॉक्रीट रस्ता बांधकाम करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (८) | ६२६१ | १० | ता. पुरंदर, जि. पुणे हा तालुका पुणे शहरालगत व सातारा, सोलापुर, नगर, मुंबई या राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्वाचा दुवा असल्याने दिवसेंदिवस नागरीकरणात वाढ होत आहे. त्यातच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत तालुक्यातील बराचसा भाग व नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे चक्राकार मार्ग, औरंगाबाद राष्ट्रीय महामार्ग प्रस्तावित असणे,गावठाण हद्दीत वाढत्या कुंटुंबांना पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने शेतवस्त्या वाढलेल्या असणे त्यामुळे गावपातळीवर नागरीकांच्या सोयीसाठी नव्याने तयार केलेले रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचे असूनही आपल्या रस्ते विकास योजनेत सामविष्ट नसल्याने सध्या या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता वारंवार मागणी असुनही रस्त्यांची कामे करताना अडीअडचणी निर्माण होत असल्याने सदर रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करणे गरजेचे असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुभाष धोटे** |
| (९) | ६२८९ | १० | राजुरा विधानसभा ( जिल्हा- चंद्रपूर) क्षेत्रातील राजुरा, कोरपना, जिवती, गोंडपिपरी या चारही तालुक्यात प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग, राज्य मार्गांची अत्यंत दुरावस्था झालेली असून वारंवार अपघात होत असणे, या भागात मोठ्या प्रमाणावर कोळसा खाणी, सिमेंट कारखाने अस्तित्वात असणे, सदर मार्गाने सातत्याने जड वाहतूक होत असल्याने रस्ते अक्षरशः उखडून गेलेले असणे, जागोजागी तुटलेल्या, खराब रस्त्यांवरील वाहतुकीमुळे या भागात धुळीचे साम्राज्य पसरलेले असणे, मात्र गेल्या दोन वर्षांपासून राज्य शासनाने रस्ते विकासाकरिता कोणताही निधी मंजूर केलेला नसणे, भागातील रस्ता दुरुस्ती, बांधकाम यासाठी साधारण 200 करोड रुपयांचा निधी तातडीने मंजुर करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (१०) | ६२४५ | १०० | राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या प्रमुख जिल्हा मार्ग व इतर मार्गावर रस्ते यांचे परीरक्षण व दुरुस्तीसाठी रु. 200,00,00,000/- इतक्या अतिरिक्त निधीचा तरतूद करण्याचे करण्यात आले आहे. परंतु, 128 डहाणू (अ. ज) विधानसभा मतदारसंघात तसेच पालघर जिल्हा हा आदिवासी जिल्हा असल्याने या ठिकाणी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नसल्याने तसेच, पालघर जिल्ह्यातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 जात असून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याचे दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने काँक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. परंतु वळणा वळणावर काम सुरू असल्याने अपघाताचे प्रमाण देखील वाढले. त्यामुळे निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कोणतीही उपाययोजना केलेली दिसत नाही तसेच त्याठिकाणी काम सुरू असलेल्या ठेकेदाराने देखील संरक्षण संदर्भात कोणतीही उपाययोजना केलेली नाही असे दिसते त्यामुळे गोरगरीब आदिवासी बांधवांचे देखील बळी जात आहेत. त्या अनुषंगाने सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी करत आहे. तसेच, 128 डहाणू (अ. ज) विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांसाठी तातडीने उपाययोजना करण्यासंदर्भात 50 कोटी रुपयाची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (११) | ६२४८ | १० | मुंबई ते गोवा चा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम गेल्या 12 वर्षापासून अपूर्ण असणे, विविध समस्यामूळे हे काम अडकले असणे, उड्डाण पूलाचे काम मार्गी लागले नसणे, शहरातील अनेक भागात सर्व्हीस रोडचे काम झाले नसणे, अद्याप काँक्रीटिकरणाचे काम सुरु केले नसणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१२) | ६२३१ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील लोहारा मेंढा रस्ता अनेक दिवसापासून ना दुरुस्त असणे, रस्ता नादुरूस्त असल्यामुळे (दळणवळणास) मोठ्या प्रमाणात तेथील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६२३२ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील लोहारा नरव्हा पाथरी रस्ता अनेक दिवसापासून ना दुरुस्त असणे, रस्ता नादुरूस्त असल्यामुळे (दळणवळणास) मोठ्या प्रमाणात तेथील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ६२३३ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील वाकल गोंदी देवरी अनेक दिवसापासून ना दुरुस्त असणे, रस्ता नादुरूस्त असल्यामुळे (दळणवळणास) मोठ्या प्रमाणात तेथील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ६२३४ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील मलकाझरी खुशिंपार रस्ता अनेक दिवसापासून ना दुरुस्त असणे, रस्ता नादुरूस्त असल्यामुळे (दळणवळणास) मोठ्या प्रमाणात तेथील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ६२३५ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील सालेभाटा परसोडी केसलवाडा रस्ता अनेक दिवसापासून ना दुरुस्त असणे, रस्ता नादुरूस्त असल्यामुळे (दळणवळणास) मोठ्या प्रमाणात तेथील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ६२३६ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील सोलभाटा सिंदीपार रस्ता अनेक दिवसापासून ना दुरुस्त असणे, रस्ता नादुरूस्त असल्यामुळे (दळणवळणास) मोठ्या प्रमाणात तेथील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (१८) | ६२४९ | १० | शिरुर तालुक्यातील मौजे विठ्ठलवाडी व हवेली तालुक्यातील मौजे सांगवी सांडस (जि.पुणे ) यादरम्यान भिमा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा के.टी. वेअर असून या के.टी. वेअर वरुन वाहतुक होत असणे, या के.टी. वेअर धोक्याचा असल्याने व वहातूक सुरळीत होण्यासाठी याठिकाणी मोठ्या पुलाचे बांधकाम करणे गरजेचे असणे, या गावांदरम्यान भिमानदीवर पूल झाल्यास शिरुर व हवेली तालुका जोडला जाणार असणे, तसेच पुणे – अहमदनगर रोड व पुणे सोलापूर रोडला जाण्यास वाहनाना सुरळीत होणार असणे व अंतर कमी होणार असण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१९) | ६२५१ | १० | शिरुर तालुक्यातील मौजे विठ्ठलवाडी व हवेली तालुक्यातील मौजे सांगवी सांडस (जि.पुणे ) यादरम्यान भिमा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा के.टी. वेअर असून या के.टी. वेअर वरुन वाहतुक होत असणे, या के.टी. वेअर धोक्याचा असल्याने व वहातूक सुरळीत होण्यासाठी याठिकाणी मोठ्या पुलाचे बांधकाम करणे गरजेचे असणे, या गावांदरम्यान भिमानदीवर पूल झाल्यास शिरुर व हवेली तालुका जोडला जाणार असणे, तसेच पुणे – अहमदनगर रोड व पुणे सोलापूर रोडला जाण्यास वाहनाना सुरळीत होणार असणे व अंतर कमी होणार असणे, त्याकरिता मौजे विठ्ठलवाडी ता.शिरुर, जि.पुणे व मौजे सांगवी सांडस, ता.हवेली, जि.पुणे या गावांदरम्यान भिमा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी 28 कोटी रुपयांची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ६२५३ | १० | वाघोली राहू पारगाव ता.हवेली ( जि. पुणे ) रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ६२५४ | १० | केसनंद ता.हवेली ( जि. पुणे ) चौकात उड्डाणपुलाची आवश्यकता असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ६२५५ | १० | पुणे ते शिरुर ( जि.पुणे ) रस्ता ही संपूर्ण हद्द PMRDA कडे असून वाढणारी लोकवस्ती व औद्योगिक वसाहत यामुळे सर्व्हिस रोडची आवश्यकता रोडच्या कडेला असलेल्या व्यवसाय सुरुळीत राहण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२३) | ६२६५ | १० | यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यांना जोडणाऱ्या चारगाव शिरपूर ते चंद्रपूर जिल्हा बॉर्डर (वनोजा) कि.मी १८२/१०० ते २०४/५०० (लांबी १६.९०० कि.मी) या प्रमुख राज्यमार्गाचे केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत ४८ कोटी रुपये खर्च करुन माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान पूर्ण करण्यात आलेले असणे, या रस्त्याच्या कामात अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून डांबरीकरण केलेल्या ठिकठिकाणी मोठे मोठे खडे पडलेले असणे, तसेच या रस्त्याचा भाग शिंदोला व कळमना रस्ता (४ कि.मी) व शिरपूर ते आबाई फाटा (८ कि.मी.) हा सहा महिन्यापूर्वी झालेला रस्ता नादुरुस्त झाला असून अनेक ठिकाणी रस्त्याच्या पृष्ठभागावर भेगा पडल्या असून रस्त्याचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलेले असणे, या रस्त्यांच्या कामांमध्ये कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याने याची दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून चौकशी करुन संबंधित कंत्राटदार, उप कंत्राटदार व शासकीय अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे तक्रारी करुनही अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ६२८८ | १० | पालघर जिल्ह्यातील मनोर-वेळगाव रस्त्यासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून साडे आठ कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असणे, तथापि या रस्त्याची दर्जोन्नती झाल्याने सदरहू रस्ता माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत होऊन एक वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून पुढील कार्यवाही होत नसल्याने रस्त्याची दुरावस्था झालेली असणे, सदरहू रस्त्यांवर वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांना तसेच तेथील रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असणे, तरी रस्त्याच्या दुरावस्थेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तातडीने कारवाई करुन रस्त्याची दुरुस्तीची कार्यवाही सत्वर करण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**बाब क्रमांक: ६०, रूपये:- १,०००/-**<br>**अॅड. अशोक पवार** |
| (२५) | ६२५२ | १० | शिरुर ( जि. पुणे ) येथे सार्वजनिक बांधकामाच्या विश्रामगृहाच्या विस्तारित इमारत बांधकामाकरिता सुमारे रुपये 8 कोटीची आवश्यकता असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ६२, रूपये:- १,०००/-**<br>**अॅड. अशोक पवार** |
| (२६) | ६२५० | १० | पुणे जिल्ह्यातील मौजे कोरेगांव मुळ, ता.हवेली येथे मुळामूठा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा असणे, या बंधाऱ्यावरुन उरळीकांचन वाडेबोलाई शिरसवडी भिवरी इत्यादी गावांना शेतमाल वाहतूक विद्यार्थी व स्थानिक नागरिकांना उरळीकांचन येथील बाजारपेठेत ये-जा करणे जवळचा मार्ग असणे, सदर कोल्हापूर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पद्धतीच्या बंधाऱ्यावरुन अवजड वाहनांची वाहतूक करणे धोकादायक असून बंधाऱ्याची दुरावस्था झालेली असणे, सदर मुळामुठा नदीवर मोठा पुल झाल्यास वेळेची व इंधनाची बचत होणार असून परिसरातील गावांना वाहतूकीसाठी सोईचे होणार असणे, याकरिता कोरेगाव मूळ येथे मुळा मुठा नदीवर रा.मा.117 ते इजिमा 136 या रस्त्यांना जोडणाऱ्या मोठ्या पुलाचे बांधकामाकरिता 25 कोटी रुपयांची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ६५, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (२७) | ६२४४ | १०० | राज्यातील महसूल विभागाअंतर्गत विविध शासकीय कार्यालयीन इमारत व निवासी इमारतीचे बांधकाम व इतर संबंधित कामांसाठी आस्थापना खर्च व हत्यारे व सयंत्र यांवरील खर्च खर्चासह ₹ 45,08,00,000/- इतका निधी तरतूद करण्यात आलेला आहे. परंतु, 128 डहाणू (अ.ज.) विधानसभा मतदारसंघांमध्ये डहाणू व तलासरी हे दोन तहसील आहेत. या तहसीलदार कार्यालय करीता तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय विश्राम गृहाच्या दुरुस्तीसाठी कोणतेही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. त्याअनुषंगाने तहसीलदार कार्यालयाकरिता ₹ 20 लाख रुपये व तलासरी तहसीलदार ₹ 10 लाख रुपये व ₹ 20 लक्ष शासकीय विश्रामगृहाच्या दुरुस्तीसाठी तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ७३, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२८) | ६२८० | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर हे शहर महाराष्ट्र व मध्य प्रदेश या दोन राज्याच्या सीमेवर वसलेले असून उत्तरेला तापी नदी तसेच मुंबई-दिल्ली या महानगरांना जोडणारा लोहमार्ग आहे. तसेच रावेर तालुक्याच्या दक्षिणेला सातपुडा पर्वत आहे. तालुक्यात एकूण १२५ गावे असून त्यात २२ गावे आदिवासी वस्तीची आहेत. त्यासाठी ग्रामीण रूग्णालयाचे श्रेणीवर्धन होवून उपजिल्हा रुग्णालय (१०० खाटा) होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्या होत्या. सदर प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करून शासनाकडे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पाठविलेला आहे. तसेच ग्रामीण रूग्णालयात सुविधा, औषधी व कर्मचारी संख्या पुरेशा प्रमाणात नसल्याने रुग्णांना उपचार वेळेत न मिळण्यामुळे नागरिकांना जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई